॥ तुझ्या गळा माझ्या गळा ॥

गीतः भा. रा. तांबे

ताईः तुझ्या गळा, माझ्या गळा
गुंफु मोत्यांच्या माळा
दादाः ताई आणखी कोणाला?
ताईः चल रे दादा, चहाटळा ॥ धृ. ॥

ताईः तुज पगडी, मज चिरडी
दादाः आणखी शेला कोणाला?
ताईः वेड लागले दादाला
दादाः मला कुणाचे, ताईला ॥ १ ॥

ताईः तुज कंठी, मज अंगठी
दादाः आणखी गोफ कोणाला?
ताईः दादा, सांगू बाबांना?
दादाः सांग तिकडच्या स्वारीला ॥ २ ॥

ताईः खुसु खुसु, गाली हसू
दादाः वर वर अपुले रुसु रुसु
ताईः चल निघ येथे नको बसु
दादाः घर तर माझे तसू तसू ॥ ३ ॥

ताईः कशी कशी, आज अशी
दादाः गंमत ताईची खाशी
ताईः आता गट्टी फु दादाशी
दादाः तर मग गट्टी कोणशी? ॥४॥

चिरडीः (लहान मुलींसाठी) साडी
तसूः थोडेसे